ePaper

शिंदेसेनेच्या युक्तिवादानं सुप्रीम कोर्टासमोर नवा पेच; अपात्र आमदारांचा निर्णय कोण घेणार?

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

पुणे महानगर प्रदेशाच्या विकासाचा 'मास्टर प्लॅन'!

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 05 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

अमेरिका माध्यवधी निवडणुकीत डेमोक्रॅट्सचा ऐतिहासिक विजय

डोनाल्ड ट्रम्प यांना झटका!

महाईन्यूज । वॉशिंग्टन

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. डेमोक्रॅटिक पक्षाने सिनेट आणि प्रतिनिधी गृह या संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये बहुमत मिळवत ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. ट्रम्प यांच्या गेल्या दोन वर्षांतील कारभाराविरोधात अमेरिकन मतदारांनी कौल दिल्याचे या निकालातून स्पष्ट होत आहे. या पराभवामुळे ट्रम्प प्रशासनाच्या आगामी धोरणांवर डेमोक्रॅट्सचा प्रभाव वाढणार असून, महत्त्वाच्या निर्णयांमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाने सिनेटमध्ये ५४ जागा, तर प्रतिनिधी गृहात २२५ जागा जिंकल्या आहेत. रिपब्लिकन पक्षाचे दोन्ही सभागृहांवरील वर्चस्व संपुष्टात आल्याने ट्रम्प यांच्यासमोरील राजकीय आव्हाने वाढली आहेत. वाढती महागाई, राहणीमानाचा खर्च आणि इराणसोबतचे युद्ध यांसारख्या मुद्द्यांवर मतदारांमध्ये असलेली नाराजी या निकालातून प्रतिबिंबित झाली आहे. विशेषतः ट्रम्प यांच्या धोरणांना विरोध करण्यासाठी मतदारांनी डेमोक्रॅट्सच्या बाजूने कौल दिल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

या निकालाचे पडसाद जागतिक शेअर बाजारातही उमटताना दिसत आहेत. अमेरिकन शेअर बाजारातील डाऊ फ्युचर्समध्ये ७७० अंकांची वाढ होऊन तो ५२,५५७ अंकांवर पोहोचला. निवडणुकीच्या निकालापूर्वी घसरणीच्या दिशेने असलेल्या बाजाराने निकालानंतर तेजीचे संकेत दिले आहेत. आशियाई बाजारांमध्येही सकारात्मक वातावरण पाहायला मिळाले. हँगसेंग निर्देशांक १.६७ टक्क्यांनी, तर कोस्पी निर्देशांक ०.६२ टक्क्यांनी वधारला. ब्रिटनच्या बाजारातही ०.३० टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

भारतीय शेअर बाजारातही सेन्सेक्स आणि निफ्टीने तेजी नोंदवली. सेन्सेक्स सुमारे ३५० अंकांनी, तर निफ्टी १०० अंकांनी वधारला. मात्र, भारतीय बाजारातील या तेजीमागे अमेरिकेतील निवडणूक निकालांपेक्षा कच्च्या तेलाच्या किमतीतील एक टक्क्यांची घसरण आणि दीर्घकालीन भांडवली नफा कराबाबतच्या घडामोडी ही प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, ऐतिहासिक निकालानंतर डेमोक्रॅटिक पक्षाच्या विजयाची चर्चा अमेरिकेत सुरू झाली आहे. टेक्सासमध्ये जेम्स टॅलारिको यांनी सिनेटची जागा जिंकत पक्षासाठी नवा इतिहास घडवला. मिशिगनमध्ये अब्दुल अल-सईद यांच्या विजयामुळे सिनेटमध्ये मुस्लिम प्रतिनिधित्वाचा नवा अध्याय सुरू झाला. मेनमध्ये ट्रॉय जॅक्सन यांनी सुझान कॉलिन्स यांचा पराभव केला, तर ओहायोच्या गव्हर्नरपदाच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाच्या एमी ॲक्टन यांनी बाजी मारली.

या निकालानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी डेमोक्रॅट्ससोबत काम करण्याची तयारी दर्शवली आहे. विरोधी पक्षासोबत सहकार्य करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, १९८२ पासूनच्या मध्यावधी निवडणुकांच्या आकडेवारीनुसार, अशा निवडणुकांनंतरच्या तीन महिन्यांत एस अँड पी ५०० निर्देशांकाने ११ पैकी आठ वेळा सरासरी १० टक्के परतावा दिला आहे. त्यामुळे आगामी काळात अमेरिकन शेअर बाजारात तेजी कायम राहणार का, याकडे जागतिक गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे.

डेमोक्रॅट्सचा ऐतिहासिक विजय

डेमोक्रॅट्ससाठी मिळालेल्या मोठ्या विजयांमध्ये, जेम्स टॅलारिको हे टेक्सासमध्ये अमेरिकन सिनेटची जागा जिंकणारे पक्षाचे पहिले उमेदवार ठरले आहेत. ॲडम हॅमिल्टन हे १९३२ नंतर कॅन्ससमध्ये अमेरिकन सिनेटची जागा जिंकणारे पहिले डेमोक्रॅट असतील. मेन राज्यावर सलग ३० वर्षे वर्चस्व गाजवणाऱ्या सुझान कॉलिन्स यांचा ट्रॉय जॅक्सन यांनी पराभव केला, तर अब्दुल अल-सईद यांनी मिशिगनमधील अमेरिकन सिनेटच्या निवडणुकीत विजय मिळवला आहे. डॉ. अब्दुल अल-सईद यांनी मिशिगनमध्ये विजय मिळवून एक नवा इतिहास रचला असून, सिनेटवर निवडून येणारे ते पहिले मुस्लिम व्यक्ती ठरतील. याशिवाय, रामस्वामी यांच्याविरुद्ध झालेल्या चुरशीच्या लढतीनंतर डेमोक्रॅट एमी ॲक्टन यांनी ओहायोच्या गव्हर्नरपदाची निवडणूक जिंकली आहे.

डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले?

निवडणुकीच्या निकालानंतर डेमोक्रॅटिक पक्षासोबत सहकार्य करणार का, याबाबत विचारलं असता ट्रम्प यांनी सकारात्मक उत्तर दिलं. "आम्ही डेमोक्रॅट्ससोबत काम करू. त्यांच्यासोबत काम करण्यास आम्ही उत्सुक आहोत. आम्ही बहुधा काहीतरी मार्ग काढू", असं ट्रम्प यांनी म्हटल्याचं न्यूयॉर्क टाइम्सने आपल्या वृत्तात नमूद केलं आहे.



नागरिकांच्या आरोग्याशी खेळ; एफडीएची कारवाई!

मोतीचूर लाडू, बुंदी आणि बर्फीचा १,४९१ किलो साठा नष्ट

महाईन्यूज । पुणे

सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या मिठाई विक्रेत्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर कारवाई केली आहे. 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेंतर्गत कोंढवा बुद्रुक आणि धानोरी परिसरात करण्यात आलेल्या तपासणीत तब्बल १ हजार ४९१ किलो संशयास्पद मिठाईचा साठा आढळला. या साठ्याची किंमत २ लाख ९४ हजार ९०० रुपये असून, प्रशासनाने संपूर्ण मिठाई जागेवरच नष्ट केली आहे.



कोंढवा बुद्रुक येथील टिळेकरनगर परिसरातील मे. गायत्री लाडू भांडार येथे अन्न सुरक्षा अधिकारी के. व्ही. बारवकर यांच्या नेतृत्वाखाली तपासणी करण्यात आली. यावेळी १ हजार ८ किलो मोतीचूर लाडू आणि १८० किलो मोतीचूर बुंदी असा एकूण १ हजार १८८ किलो मिठाईचा साठा आढळला. या साठ्याची किंमत १ लाख ७३ हजार ७०० रुपये होती. हा संपूर्ण साठा जप्त करून नष्ट करण्यात आला. तसेच संबंधित दुकानाचा अन्न परवानाही तातडीने निलंबित करण्यात आला.

दुसरी कारवाई धानोरी येथील आळंदी-मरकळ रस्त्यावरील माऊली कॉम्प्लेक्समधील मे. आर. बिकानेर मिठाई केंद्रात करण्यात आली. येथे १ लाख २१ हजार २०० रुपये किमतीचा ३०३ किलो बर्फीचा साठा आढळला. हा साठा संशयास्पद आणि निकृष्ट दर्जाचा असल्याचे तपासणीत निदर्शनास आले. विशेष म्हणजे, बर्फीची साठवणूक खोलीच्या तापमानावर करण्यात आली होती. मिठाईवर आवश्यक लेबल नव्हते, तसेच खरेदीची बिलेही उपलब्ध नव्हती. नाशवंत पदार्थ असल्याने हा साठाही जागेवरच नष्ट करण्यात आला. याशिवाय कलाकंदाचा नमुना प्रयोगशाळेतील तपासणीसाठी घेण्यात आला.

ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी एच. आर. मारेवार यांनी केली. क्षेत्रीय सहाय्यक आयुक्त एस. एन. चट्टे आणि सह आयुक्त (अन्न) एस. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

दरम्यान, मिठाई व अन्य खाद्यपदार्थांची योग्य साठवणूक करावी, त्यावर नियमानुसार लेबलिंग असावे आणि खरेदीची बिले व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध ठेवावीत, असे आवाहन एफडीएने केले आहे. नागरिकांनी मिठाई खरेदी करताना तिची वैधता आणि दर्जा तपासावा. संशयास्पद किंवा मुदतबाह्य खाद्यपदार्थांची विक्री आढळल्यास १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे सह आयुक्त (अन्न) एस. करकाळे यांनी सांगितले.

आरोग्याशी तडजोड नको!

सणासुदीच्या काळात मिठाईची खरेदी वाढत असताना ग्राहकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. मिठाईचा रंग, वास, ताजेपणा आणि साठवणुकीची पद्धत तपासावी. विक्रेत्याकडून खरेदीचे बिल घ्यावे. अन्नपदार्थांबाबत संशय आल्यास प्रशासनाकडे तक्रार करून इतरांचे आरोग्य धोक्यात येण्यापासून रोखावे.

शरद पवारांची प्रकृती सुधारली; रुग्णालयातून डिस्चार्ज

महाईन्यूज । पुणे

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने बुधवारी (४ नोव्हेंबर) त्यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमधून डिस्चार्ज देण्यात आला. त्यांची प्रकृती स्थिर असून, रुग्णालयातून ते थेट मुंबईतील निवासस्थानी रवाना झाले. रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य हृदयरोगतज्ज्ञ, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. परवेझ के. ग्रँट यांनी अधिकृत निवेदनाद्वारे ही माहिती दिली.



खोकला आणि छातीत दुखण्याचा त्रास जाणवू लागल्याने शरद पवार यांना सोमवारी (२ नोव्हेंबर) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागाचा दौरा सुरू केला होता. या दौऱ्यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून पाणीटंचाई, पिकांची स्थिती आणि शेतीसमोरील अडचणी जाणून घेतल्या जात होत्या. मात्र, दौऱ्यादरम्यान अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी दौरा अर्धवट सोडला आणि वैद्यकीय उपचार घेण्याचा निर्णय घेतला.

श्वास घेताना तसेच खोकताना छातीत वेदना होत असल्याने डॉक्टरांनी त्यांची सविस्तर तपासणी केली. डॉ. परवेझ ग्रँट यांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार करण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते. दोन दिवसांच्या उपचारांनंतर त्यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली. त्यामुळे बुधवारी त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, ते उत्तम असल्याचे डॉ. ग्रँट यांनी निवेदनात स्पष्ट केले.

आता नोव्हेंबरमध्ये पुन्हा प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागले. मात्र, दोन दिवसांच्या उपचारांनंतर प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. ते मुंबईतील निवासस्थानी रवाना झाल्याने त्यांच्या समर्थकांना दिलासा मिळाला आहे.

यंदा तिसऱ्यांदा रुग्णालयात दाखल

शरद पवार यांना यंदा तिसऱ्यांदा रुग्णालयात दाखल व्हावे लागले. यापूर्वी ९ फेब्रुवारी रोजी छातीतील संसर्ग आणि खोकल्याचा त्रास झाल्याने त्यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले होते. पाच दिवसांच्या उपचारांनंतर १४ फेब्रुवारीला त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यानंतर २२ फेब्रुवारीला सौम्य निर्जलीकरणाचा त्रास झाल्याने त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. २५ फेब्रुवारीला त्यांना घरी सोडण्यात आले होते.

पुणे महानगर प्रदेशाच्या विकासाचा 'मास्टर प्लॅन'!

मेट्रो, इलेक्ट्रिक बस, रिंगरोड आणि बोगद्यांमुळे वाहतूक व्यवस्थेत मोठे परिवर्तन

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए परिसरात मेट्रो, इलेक्ट्रिक बस, रिंगरोड, बोगदे आणि विमानतळ अशा आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत पुणे महानगर प्रदेश देशातील महत्त्वाचे मोबिलिटी हब बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हिंजवडी ते शिवाजीनगर या पुणे मेट्रो मार्गिका टप्पा तीनचे उद्घाटन तसेच पुणे मेट्रो टप्पा दोनमधील विस्तारित चार नव्या मार्गांचे भूमिपूजन मंगळवारी (दि. ३) म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात झाले. या सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

पुणे महानगर प्रदेशाला मोठे शहरी विकास केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने पाच हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए परिसरात आधुनिक वाहतूक व्यवस्था विकसित केली जाणार आहे. पुणे मेट्रो ही पर्यावरणपूरक ग्रीन मेट्रो म्हणून विकसित होत असून, आवश्यक ऊर्जेपैकी ३० टक्के ऊर्जा स्वतः निर्माण करणार आहे.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रोसोबतच इलेक्ट्रिक बस, इनर व आउटर रिंगरोड, सीएमटीआर, भूमिगत मार्ग आणि बोगद्यांचे जाळे विकसित केले जात आहे. या सुविधांमुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ होईल. पुणे हे आयटी आणि उत्पादन क्षेत्राबरोबरच फ्रंटियर टेक्नॉलॉजीचेही महत्त्वाचे केंद्र बनेल. देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यात पुण्याचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असे फडणवीस यांनी सांगितले.

महिलांच्या हाती मेट्रोचे सारथ्य

शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर उभारण्यात आलेला देशातील पहिला प्रकल्प आहे. टाटा समूह आणि सीमेन्स कंपनीने या प्रकल्पाची उभारणी केली आहे. या मेट्रोच्या उभारणीपासून संचालनापर्यंत महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. या मार्गावरील कर्मचाऱ्यांमध्ये ५० टक्के महिला आहेत. मेट्रोचे सारथ्य महिलांकडे असणे ही अभिमानाची बाब आहे, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.



आयटीयन्सना वाहतूक कोंडीतून दिलासा

हिंजवडी हा देशातील महत्त्वाचा आयटी हब आहे. या परिसरात दररोज हजारो अभियंते कामासाठी येतात. वाहतूक कोंडीमुळे त्यांना अनेकदा एक ते दोन तास अडकून राहावे लागते. मेट्रो सुरू झाल्यामुळे आयटी क्षेत्रातील कर्मचारी, विशेषतः तरुण-तरुणींना मोठा दिलासा मिळेल. या प्रकल्पाचे भूमिपूजन २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. आता त्यांच्याच हस्ते लोकार्पण होत असल्याचा आनंद आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अजितदादांच्या योगदानाचा गौरव

पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विकासात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. मेट्रो प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालापासून मंजुरी आणि निधी उपलब्ध करून देण्यापर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पूर्ण व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता, असे एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी नमूद केले.

पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती; १३० जणांची नियुक्ती निश्चित!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत १३० उमेदवारांना नियुक्तिपत्रे देण्यात आली आहेत. मराठी, हिंदी आणि उर्दू माध्यमांसाठी एकूण १३९ उमेदवारांचे समुपदेशन करण्यात आले. विशेष म्हणजे निवड झालेल्या उमेदवारांमध्ये महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेतलेल्या दोन माजी विद्यार्थ्यांचाही समावेश आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ च्या आधारे पवित्र पोर्टलमार्फत शिफारस झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. पहिल्या आणि दुसऱ्या फेरीतील उमेदवारांची कागदपत्र पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पात्र आणि अपात्र उमेदवारांची यादी निश्चित करण्यात आली. त्यानंतर शिक्षण विभागाने समुपदेशन प्रक्रिया राबवून पात्र उमेदवारांना नियुक्तिपत्रांचे वितरण केले.

ही प्रक्रिया महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. उपायुक्त ममता शिंदे आणि प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी प्रक्रियेची जबाबदारी सांभाळली.

या प्रक्रियेत एक उमेदवार शैक्षणिक अर्हतेअभावी अपात्र ठरला. तर आठ उमेदवारांच्या पात्रतेबाबत अभिप्राय मागविण्यासाठी शिक्षण आयुक्तांकडे पत्र पाठविण्यात आले आहे, अशी माहिती प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी दिली.



माजी विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड!

महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेतलेल्या दोन माजी विद्यार्थ्यांची यंदा शिक्षकपदी निवड झाली आहे. ज्या शाळांमध्ये त्यांनी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचे धडे गिरवले, त्याच महापालिका शिक्षण व्यवस्थेत आता शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना घडविण्याची संधी त्यांना मिळाली आहे. विद्यार्थीदशेत मिळालेल्या शिक्षणाचा आणि अनुभवाचा उपयोग आता ते नव्या पिढीच्या जडणघडणीसाठी करणार आहेत. त्यांच्या या निवडीमुळे महापालिका शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळाले असून, सध्याच्या विद्यार्थ्यांसमोरही एक सकारात्मक आदर्श निर्माण झाला आहे.

१३० शिक्षकांना नियुक्ती!

महापालिकेच्या शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर करण्याच्या दृष्टीने भरती प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या १३० उमेदवारांना नियुक्तिपत्रे देण्यात आली. मराठी, हिंदी आणि उर्दू माध्यमांतील १३९ उमेदवारांचे समुपदेशन करण्यात आले. यामध्ये महापालिका शाळांतील दोन माजी विद्यार्थ्यांचाही समावेश आहे.

"नव्या नियुक्त्यांमुळे महापालिका शाळांतील शिक्षकांची उपलब्धता वाढून भरती प्रक्रियेला गती मिळेल. विशेष म्हणजे, महापालिका शाळांमध्ये शिकलेल्या दोन माजी विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड होणे ही अभिमानाची बाब आहे."

- ममता शिंदे, उपायुक्त, महापालिका

भूमिका

गगनयान ते चांद्रयान; अंतराळात भारताची महाझेप!



भारताने अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात गेल्या काही दशकांत जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. चांद्रयान मोहिमेचे यश, मंगळयानाची कामगिरी आणि उपग्रह प्रक्षेपणातील वाढती क्षमता यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचा (इस्रो) लौकिक जगभर पोहोचला आहे.

आता केवळ उपग्रह प्रक्षेपण किंवा चंद्र संशोधनापुरते मर्यादित न राहता मानवी अंतराळ उड्डाण, अत्याधुनिक प्रक्षेपण सुविधा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अशा विविध आघाड्यांवर भारताने मोठी झेप घेण्याची तयारी केली आहे. २०२९ पर्यंत चार प्रक्षेपण सुविधा कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट, गगनयान मोहिमेच्या चाचण्या आणि जपानच्या सहकार्याने चांद्रयान-५ मोहिमेचे नियोजन हा त्याच महत्त्वाकांक्षी वाटचालीचा भाग आहे. अंतराळ क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेता भारतासाठी प्रक्षेपण सुविधांचा विस्तार ही काळाची गरज आहे. दळणवळण, हवामान अंदाज, संरक्षण, शेती, आपत्ती व्यवस्थापन आणि पृथ्वी निरीक्षणासाठी उपग्रहांचे महत्त्व वाढत आहे.

त्यामुळे उपग्रह प्रक्षेपणांची मागणीही वाढत आहे. सध्या श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारताला आगामी काळात अधिक सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता भासणार आहे. तामिळनाडूतील कुलसेकरपट्टिनम येथे उभारण्यात येणारे प्रक्षेपण संकुल या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. विशेषतः लघुउपग्रहांच्या प्रक्षेपणासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध झाल्यास वेळ आणि खर्चाची बचत होऊन भारताची प्रक्षेपण क्षमता वाढू शकेल.

या विस्ताराबरोबरच गगनयान मोहीम भारताच्या वैज्ञानिक क्षमतेची खरी कसोटी ठरणार आहे. स्वतःच्या तंत्रज्ञानाच्या बळावर भारतीय अंतराळवीरांना अंतराळात पाठवणे ही केवळ प्रतिष्ठेची बाब नाही, तर तांत्रिक स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. या मोहिमेपूर्वी मानवरहित चाचण्या घेण्यावर भर दिला जात आहे. अंतराळयानातील प्राणवायू, तापमान, दाब, वातावरण नियंत्रण आणि आपत्कालीन सुरक्षा यंत्रणा सक्षम असणे अत्यावश्यक आहे. कारण अंतराळ मोहिमेत छोटीशी तांत्रिक चूकही मोठ्या संकटाला आमंत्रण देऊ शकते. त्यामुळे हजारो प्रयोग आणि वारंवार चाचण्या हा विलंब नसून सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेला शास्त्रीय दृष्टिकोन आहे.

चांद्रयान-३ च्या यशानंतर चांद्रयान-५ मोहिमेच्या माध्यमातून भारत चंद्र संशोधनाचा पुढील टप्पा गाठण्याच्या तयारीत आहे. जपानच्या सहकार्याने सुमारे ३५० किलो वजनाचा रोव्हर चंद्रावर पाठवण्याची योजना महत्त्वपूर्ण आहे. सुमारे १०० दिवस कार्यरत राहणाऱ्या या रोव्हरमुळे चंद्राच्या पृष्ठभागाविषयी अधिक माहिती मिळू शकते. आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे संशोधनातील अनुभव, तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक क्षमता यांची देवाणघेवाण होण्यासही मदत होईल. मात्र, या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करताना आर्थिक शिस्त, संशोधनाचा दर्जा आणि प्रकल्पांची वेळेत पूर्तता यांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. अंतराळ क्षेत्रातील खासगी कंपन्यांचा सहभाग वाढवणे ही सकारात्मक बाब आहे. इस्रोने आपले मूलभूत संशोधन आणि धोरणात्मक नियंत्रण कायम ठेवून खासगी उद्योगांना तंत्रज्ञान विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास रोजगारनिर्मिती आणि नवउद्योगांना चालना मिळू शकते.

भारताची अंतराळभरारी ही केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कामगिरी नसून देशाच्या आत्मनिर्भरतेचीही कसोटी आहे. मात्र, घोषणांपेक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणी, संशोधनातील सातत्य आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळनिर्मिती महत्त्वाची ठरणार आहे. गगनयान, चांद्रयान-५ आणि नव्या प्रक्षेपण सुविधा या योजना यशस्वी झाल्यास भारत जागतिक अंतराळ क्षेत्रातील प्रभावी शक्ती म्हणून अधिक भक्कमपणे उभा राहील. अंतराळातील महासत्तेच्या दिशेने भारताची ही झेप निश्चितच आशादायी आहे.

प्रासंगिक »

गावाचा इतिहास

एका गावातील जुन्या वाचनालयात एक मोठा फलक लावलेला होता. त्यावर गावातील थोर व्यक्तींची नावे लिहिली होती. मात्र, काळाच्या ओघात फलकावरील अक्षरे पुसट झाली. गावकऱ्यांनी नवीन फलक लावण्याचा निर्णय घेतला.

वाचनालयात येणारा एक तरुण चित्रकार हे पाहत होता. त्याने फलक बदलण्याऐवजी त्यावरील प्रत्येक नावाची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या भेटी घेऊन त्याने त्या व्यक्तींचे कार्य, योगदान आणि आठवणी लिहून काढल्या. त्यानंतर प्रत्येक नावासमोर छोटी माहिती लिहून फलक नव्याने तयार केला.

नवीन फलक पाहून गावातील तरुणांना आपल्या गावाच्या इतिहासाची ओळख झाली. ज्येष्ठ नागरिकांनाही आपल्या आठवणी जतन झाल्याचा आनंद झाला. वाचनालयातील तो फलक आता केवळ नावांची यादी राहिला नव्हता, तर गावाच्या इतिहासाचा ठेवा बनला होता.

- तात्पर्य : इतिहास जपला तरच पुढच्या पिढीला आपल्या मुळांची ओळख होते.

महाराष्ट्रातील ३५८ पैकी तब्बल ३०५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्याची वेळ येणे, ही केवळ निसर्गाची अवकृपा नाही, तर राज्याच्या जलव्यवस्थापनातील त्रुटींचेही गंभीर वास्तव आहे.

दुष्काळ निसर्गाचा की नियोजनाचा?



राज्यातील ८५ टक्क्यांहून अधिक तालुक्यांना दुष्काळी उपाययोजनांची गरज भासत असेल, तर त्यामागील कारणांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. दरवर्षी पावसाची अनिश्चितता, पाण्याची टंचाई आणि शेतकऱ्यांचे नुकसान यांची पुनरावृत्ती होत असताना केवळ पावसाला दोष देऊन सरकारला जबाबदारी झटकता येणार नाही.

हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी, तर त्यानंतर दीर्घकाळ पावसाचा खंड, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. परिणामी पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वाहून जाते. भूजल पुनर्भरण होत नाही आणि विहिरी, बोअरवेल आटू लागतात. धरणांमधील पाणीसाठाही अपेक्षेइतका राहत नाही. त्यामुळे दुष्काळाचे संकट अधिक तीव्र होते. मात्र, या संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करण्याची इच्छाशक्ती आणि दूरदृष्टी आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील जलसंपत्तीचे वितरणही विषम आहे. कोकणात मुबलक पाऊस आणि पाणी उपलब्ध असताना मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. राज्यातील बहुतांश लोकसंख्या आणि शेती कमी जलसंपत्ती असलेल्या नदीखोऱ्यांमध्ये केंद्रित आहे. ही विसंगती लक्षात घेऊन पाणी नियोजनाचे धोरण आखणे गरजेचे आहे. पाणलोट विकास, जलसंधारण, शेततळी, बंधारे आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांना प्राधान्य द्यायला हवे. शेतीतील पाणी वापराचा प्रश्नही दुर्लक्षित करून चालणार नाही. दुष्काळी भागात मोठ्या प्रमाणावर उसाची लागवड होत असून, या पिकासाठी प्रचंड पाण्याची गरज भासते. साखर कारखान्यांचे अर्थकारण आणि शेतकऱ्यांचे हित महत्त्वाचे असले, तरी उपलब्ध पाण्याचा विचार न करता पीकपद्धती सुरू ठेवणे भविष्यात अधिक धोकादायक ठरू शकते. शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे वळवण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन आणि बाजारपेठेची हमी देणे आवश्यक आहे.

सरकारच्या मदत योजना संकटग्रस्त शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा देतात. कर्ज पुनर्गठन, महसूल सवलती, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि चारा छावण्यांसारख्या उपाययोजना आवश्यकच आहेत. मात्र, दरवर्षी मदतीची वेळ येणे हे प्रशासनाच्या नियोजनातील अपयश दर्शवते. मदतीपेक्षा संकट रोखण्याची यंत्रणा अधिक सक्षम असायला हवी. आता प्रत्येक गावाचा पाणी ताळेबंद तयार करणे, भूजल उपशावर नियंत्रण ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर आणि हवामानानुकूल शेतीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. दुष्काळ हा केवळ पावसाचा प्रश्न नसून तो नियोजन, व्यवस्थापन आणि विकासाच्या दृष्टिकोनाचा प्रश्न आहे. टँकरने तहान भागवता येईल; मात्र कायमस्वरूपी जलसुरक्षा निर्माण करता येणार नाही. महाराष्ट्राला मदतप्रधान नव्हे, तर जलसुरक्षित आणि दुष्काळमुक्त भविष्याकडे नेणारे धोरण हवे. त्यासाठी तात्पुरत्या उपायांपलीकडे जाऊन शाश्वत जलव्यवस्थापनाची ठोस अंमलबजावणी करणे हीच काळाची खरी गरज आहे.

।। अभंगवाणी ।।



हरिहरां भेद ।
नाहीं करूं नये वाद ॥१॥

एक एकाचे हृदयीं ।
गोडी साखरेच्या ठायीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

परीक्षेआधीच गुणांचा फॉर्म्युला उघड?

उत्पादन शुल्क विभागातील परीक्षेवर संशय; दोषी अधिकाऱ्यांवरील कारवाईचे काय?

महाईन्यूज । नागपूर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेतील कथित गैरप्रकारांचे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षक (गट-क) पदासाठी घेण्यात आलेल्या विभागीय परीक्षेची गुणांकन पद्धत परीक्षेपूर्वीच उघड झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या चौकशीत उत्पादन शुल्क विभागातील सह आयुक्तांसह काही अधिकारी दोषी आढळल्याची माहिती समोर आली आहे.



९० गुणांमुळे संशय!

राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षकांच्या १३७ पदांसाठी ही विभागीय परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेला एकूण ९५३ उमेदवार बसले होते. मात्र, परीक्षेपूर्वीच गुणांकन पद्धत उघड झाल्याच्या आरोपामुळे संपूर्ण परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, काही उमेदवारांना १०० पैकी ८५ ते ९० गुण मिळाल्याने त्यांच्या गुणांकनाबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. परीक्षेची काठिण्यपातळी लक्षात घेता एवढे उच्च गुण मिळण्यामागील कारणांची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या चौकशीच्या आधारे संबंधितांवर कारवाई करण्यासाठी अहवाल आयोगाकडे पाठविण्यात आल्याचे नागपूर पोलिसांच्या चौकशीत स्पष्ट झाले आहे. मात्र, या गंभीर प्रकरणानंतरही आयोगाकडून ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याने उमेदवारांमध्ये नाराजी आहे.

या कथित गैरप्रकाराबाबत रवींद्र दिनकर इंगोले यांच्यासह १५ उमेदवारांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. परीक्षेशी संबंधित गोपनीय दस्तऐवज आणि गुणांकन पद्धती आधीच उघड झाल्याचा आरोप त्यांनी केला. या तक्रारीच्या अनुषंगाने नागपूर शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे चौकशीसाठी अर्ज पाठविण्यात आला होता.

त्यानंतर नागपूर पोलिसांनी नवी मुंबई गुन्हे शाखेशी संपर्क साधून प्रकरणाची माहिती घेतली. त्यावेळी संबंधित तक्रारीची चौकशी पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. उत्पादन शुल्क विभागातील सह आयुक्तांसह काही अधिकारी दोषी आढळल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी अहवाल आयोगाकडे पाठविण्यात आल्याची माहिती समोर आली.

दरम्यान, एमपीएससीने ९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्धिपत्रक जारी करून या प्रकरणी स्पष्टीकरण दिले होते. मात्र, पोलिसांच्या चौकशीत महत्त्वाची माहिती समोर आल्यानंतरही आयोगाने परीक्षेच्या भवितव्याबाबत कोणताही ठोस निर्णय जाहीर केलेला नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, परीक्षा रद्द होणार का आणि उमेदवारांना न्याय कसा मिळणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि समान संधी या बाबींना सर्वोच्च महत्त्व असते. त्यामुळे पोलिसांच्या चौकशीतील निष्कर्षांची दखल घेऊन एमपीएससीने या प्रकरणी स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा उमेदवारांकडून व्यक्त होत आहे. आयोगाच्या पुढील निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

गोकुळच्या सत्तासंघर्षात शासनाचा 'चार मतांचा' डाव!

महाईन्यूज । कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ'च्या अध्यक्ष निवडीच्या सत्तासंघर्षात नवे वळण आले आहे. राज्य मंत्रिमंडळाने ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर चार शासननियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार देण्याच्या निर्णयाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे गोकुळमधील सत्तेचे गणित बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कोरमअभावी सभा तहकूब

गोकुळच्या पोटनियमानुसार अध्यक्ष निवडीच्या सभेसाठी किमान १४ संचालकांचा कोरम आवश्यक आहे. यापूर्वी महायुतीचे १२ संचालक अनुपस्थित राहिल्याने कोरमअभावी सभा तहकूब झाली होती. त्यानंतर सतेज पाटील गटाने उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने १० नोव्हेंबर रोजी पुन्हा सभा घेऊन अध्यक्ष निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते.



वटहुकूम जारी होण्याकडे लक्ष

मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पुढील कायदेशीर प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. राज्यपालांची मान्यता मिळून वटहुकूम जारी झाल्यास चार शासननियुक्त सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होऊ शकतो. त्यामुळे १० नोव्हेंबरच्या सभेपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होते का, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ अआअ (२) मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार संबंधित सहकारी संस्थांच्या समित्यांवर पाच सदस्य नामनिर्देशित केले जातील. यामध्ये सहाय्यक निबंधक दर्जाचा एक शासकीय अधिकारी आणि सहकार क्षेत्राचा अनुभव असलेल्या चार व्यक्तींचा समावेश असेल. शासकीय अधिकाऱ्याला मतदानाचा अधिकार नसेल; मात्र अन्य चार सदस्यांना मतदान करता येणार आहे. हे सदस्य अध्यक्ष किंवा इतर पदाधिकारीपदासाठी पात्र नसतील. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ही तरतूद लागू होणार नाही.

गोकुळच्या निवडणुकीत आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकल्या होत्या, तर महायुतीला १२ जागा मिळाल्या होत्या. आता चार शासननियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार मिळाल्यास संचालक मंडळातील संख्याबळाचे गणित बदलू शकते. त्यामुळे अध्यक्ष निवडीत महायुतीला फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी अध्यक्ष निवडीसाठी बोलावलेल्या सभेत महायुतीचे १२ संचालक अनुपस्थित राहिल्याने आवश्यक १४ सदस्यांचा कोरम पूर्ण झाला नव्हता. त्यामुळे सभा तहकूब करण्यात आली. त्यानंतर सतेज पाटील गटाने उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने १० नोव्हेंबर रोजी पुन्हा सभा घेऊन अध्यक्ष निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, महायुतीचे १२ संचालक मुंबईमार्गे अलिबागला गेले आहेत. मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर आता राज्यपालांची मान्यता आणि वटहुकूम जारी होण्याची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. ही प्रक्रिया १० नोव्हेंबरपूर्वी पूर्ण झाल्यास गोकुळच्या संचालक मंडळातील संख्याबळावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अध्यक्ष निवडीपूर्वी शासनाचा निर्णय प्रत्यक्षात कधी लागू होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अमेरिकन जनतेचा युद्धाला 'नकार'!

"इराण संघर्षाचा फटका रिपब्लिकन पक्षाला", स्वतः डोनाल्ड ट्रम्प यांची जाहीर कबुली

महाईन्यूज । वॉशिंग्टन

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून, यामध्ये अमेरिकन जनतेनं युद्धाविरुद्ध आपला कौल दिल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे. इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी, अमेरिकन नागरिकांनी महागाई आणि युद्धातील लष्करी हस्तक्षेपाविरोधात मत दिल्याचं म्हटलं आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही इराणमधील युद्धाचा फटका रिपब्लिकन पक्षाच्या निवडणुकीतील कामगिरीला बसल्याचं मान्य केलं आहे. या संदर्भातील वृत्त 'द इंडियन एक्सप्रेस'ने दिले आहे.

इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर आपली भूमिका मांडली. "अमेरिकन जनतेने महागाई आणि युद्धाला थेट नकार दिला आहे, आम्ही या संदेशाचे स्वागत करतो. अमेरिकन सरकारनं जर आंतरराष्ट्रीय दबाव आणि स्वतःच्या फायद्यासाठी जनतेच्या इच्छेकडे दुर्लक्ष केलं, तर त्यांना याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील," असा इशारा त्यांनी दिला.

दुसरीकडे, 'फॉक्स न्यूज'ला दिलेल्या मुलाखतीत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यावधी निवडणुकांतील पराभवावर भाष्य केलं. "निवडणुकीतील या निकालांमागे इराणमधील युद्ध हे एक प्रमुख कारण होते, हे मी नाकारत नाही. मात्र, त्याच वेळी इराणबाबत मी घेतलेल्या कठोर भूमिकेचं महत्त्व नागरिकांना समजलं आहे," असा दावा ट्रम्प यांनी केला. या निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाने अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये बहुमत मिळवले आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्यापुढील राजकीय अडचणी वाढल्या आहेत. डेमोक्रॅटिक पक्ष संसदेत काही कठोर विधेयके आणण्याची शक्यता असली तरी, योग्य मुद्द्यांवर एकत्र काम करण्याची तयारी ट्रम्प यांनी दर्शवली आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुका या विद्यमान राष्ट्राध्यक्षांच्या कामगिरीचा आढावा घेणाऱ्या निवडणुका म्हणून पाहिल्या जातात. राष्ट्राध्यक्षांना सत्तेवर आल्यानंतर साधारण दोन वर्षांनी होणाऱ्या या निवडणुकांमध्ये मतदार सरकारच्या धोरणांबाबत आपली नाराजी किंवा समर्थन व्यक्त करतात.



महागाई आणि इराण युद्धाचा निवडणुकीवर प्रभाव

अमेरिकेत नुकत्याच पार पडलेल्या मध्यावधी निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाने दणदणीत विजय मिळवला. टेक्सस, साऊथ कॅरोलिना, ओहायो आणि कॅन्सस या पारंपरिक रिपब्लिकन पक्षाच्या बालेकिल्ल्यांमध्ये डेमोक्रॅट्सनी विजय मिळवत सत्ता हस्तगत केली.

अमेरिकेतील वाढती महागाई, इंधनाचे भडकलेले दर आणि इराणसोबत सुरू असलेले युद्ध या तीन प्रमुख मुद्द्यांवर अमेरिकन नागरिक नाराज होते. त्याचा थेट फटका रिपब्लिकन पक्षाला बसल्याचे या निकालांवरून स्पष्ट होत आहे.

ट्रम्प यांची कबुली

निवडणुकीतील निकालानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी 'फॉक्स न्यूज'ला दिलेल्या मुलाखतीत रिपब्लिकन पक्षाच्या पराभवावर भाष्य केले. इराणमधील युद्धाचा निवडणुकीच्या निकालावर परिणाम झाला असल्याचे त्यांनी मान्य केले. युद्ध हा रिपब्लिकन पक्षाच्या खराब कामगिरीमागील प्रमुख घटकांपैकी एक होता, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, त्याचवेळी इराणबाबत आपण घेतलेली कठोर भूमिका योग्य असल्याचा दावा करत त्यांनी आपल्या निर्णयाचे समर्थनही केले. डेमोक्रॅटिक पक्षाने दोन्ही सभागृहांमध्ये बहुमत मिळवल्यामुळे आता ट्रम्प प्रशासनासमोरील राजकीय आव्हाने वाढणार आहेत. संसदेतील विरोधकांकडून सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात.

'त्यांच्या तोंडाला दारूचा वास यायचा', राहुल गांधी यांची पंजाबच्या मुख्यमंत्र्यांवर टीका

महाईन्यूज । पंजाब

पंजाब विधानसभेच्या निवडणुकीनिमित्त काँग्रेस विरुद्ध आम आदमी पक्ष असा संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे नेते, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. पंजाबमधील अमली पदार्थांविरोधात लढाई लढण्यात ते अपयशी ठरल्याचा ठपका ठेवताना राहुल गांधी म्हणाले की, भगवंत मान जेव्हा लोकसभेत यायचे तेव्हा त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत असे.

पंजाबच्या संग्रुर येथे 'इन्साफ रॅली'ला संबोधित करत असताना राहुल गांधी यांनी आम आदमी पक्षावरही टीका केली. 'आप' सरकारला दिल्लीतून नियंत्रित केले जात असल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी त्यांच्या अमली पदार्थविरोधी लढ्यातील क्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.


"भगवंत मान यांनी मद्य घेऊ नये, असे मी सांगणार नाही. तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. जर त्यांना मद्य घ्यायचेच असेल तर हा त्यांचा प्रश्न आहे. पण जर तुम्हाला व्यसनाधीनतेविरोधात लढाई लढायची असेल तर तुमचा मुख्यमंत्री रोज संध्याकाळी मद्याच्या अमलाखाली असणारा नको. तुम्हाला असा मुख्यमंत्री हवा आहे, जो पंजाबसाठी लढेल. ज्याला अमली पदार्थामुळे होणाऱ्या नुकसानाची जाणीव असेल, पंजाबच्या हृदयातील जखम त्याला स्वस्थ बसू देणार नाही, असा व्यक्ती मुख्यमंत्री म्हणून हवा", असे आवाहन राहुल गांधी यांनी केले.

राहुल गांधी यांनी पुढे आरोप केला की, पंजाबचे सरकार दिल्लीतून चालवले जाते. आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा राज्य सरकारवर अंकुश आहे. "लोकांना पंजाबसाठी काम करणाऱ्या लोकांचे सरकार हवे आहे. काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेत आल्यास ते दिल्लीच्या इशाऱ्यावर चालणार नाही. आमचा पक्ष पंजाबचे सरकार पंजाबमधूनच चालवेल", अशी ग्वाही राहुल गांधी यांनी दिली.



लोकसभेत त्यांच्या तोंडाला वास यायचा

भगवंत मान मुख्यमंत्री होण्यापूर्वी पंजाबमधून खासदार म्हणून निवडून आले होते. तेव्हाच्या दिवसांची आठवण सांगताना राहुल गांधी म्हणाले, "भगवंत मान तेव्हा लोकसभा सभागृहात आमच्या शेजारी बसायचे आणि हास्यविनोद करायचे. त्यावेळी सकाळी ११ वाजेपर्यंत त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत असे." ही आठवण सांगितल्यानंतर राहुल गांधी पुढे म्हणाले की, मद्य घेणे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे.



मामासोबतच लग्न केल्याचा पश्चाताप

अभिनेत्री राधिका आपटे आपल्या बेधडक स्वभावासाठी आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. आपल्या अभिनयाच्या जोरावर मराठी, हिंदी आणि दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या राधिकाने आता तिच्या करिअरमधील एका जुन्या अनुभवाचा असा काही खुलासा केला आहे, ज्यामुळे मनोरंजनविश्वात चर्चांना उधाण आलं आहे. एका तेलुगू चित्रपटात साकारलेल्या भूमिकेचा उल्लेख करताना तिने चक्क त्या सिनेमातील प्रत्येक गोष्टीचा तिरस्कार वाटत असल्याचं सांगितलं. या चित्रपटात तिला वयाने बऱ्याच मोठ्या अभिनेत्यासोबत रोमान्स करावा लागला होता. चित्रपटातील कथानक, नातेसंबंध आणि सेटवरील पितृसत्ताक वातावरण यामुळे हा अनुभव तिच्यासाठी अत्यंत कठीण ठरल्याचंही तिने स्पष्ट केलं. राधिका आपटे सध्या नेटफ्लिक्सवरील 'अक्का' या सीरिजमुळे चर्चेत आहे. या सीरिजमध्ये तिच्यासोबत अभिनेत्री कीर्ती सुरेशही महत्त्वाच्या भूमिकेत दिसत आहे. दोघीही सीरिजच्या प्रमोशनसाठी विविध मुलाखती देत आहेत. अशाच एका मुलाखतीदरम्यान राधिकाला तिच्या करिअरमधील सर्वात आव्हानात्मक भूमिकेबद्दल विचारण्यात आलं. यावर तिने एका तेलुगू चित्रपटातील अनुभव सांगितला. राधिका म्हणाली, 'मी एका तेलुगू चित्रपटात काम केलं होतं, ज्यात मला माझ्या मामाशी लग्न करावं लागलं होतं. ती माझ्या कारकिर्दीतील सर्वात आव्हानात्मक भूमिका होती. त्या चित्रपटातील प्रत्येक गोष्टीचा मला तिटकारा होता." राधिकाचं उत्तर ऐकून कीर्ती सुरेशला सुरुवातीला आश्चर्य वाटलं, मात्र नंतर ती जोरात हसू लागली. त्यानंतर राधिकाने तिथल्या सांस्कृतिक प्रथेबद्दल सांगितलं. "मामाशी लग्न करण्याची प्रथा तमिळ आणि तेलुगू समाजात खूप प्रचलित आहे." असं अभिनेत्री म्हणाली.



वयाच्या १४ व्या वर्षी अभिनयाला सुरुवात

९० च्या दशकात काही अभिनेत्रींना मोठं ग्लॅमर मिळालं त्या नावांमध्ये अभिनेत्री तब्बूचं नाव घेता येईल. या अभिनेत्रीने करिअरच्या सुरुवातीच्या काळात मोठा संघर्ष केला. ज्या चित्रपटातून तिने पदार्पण केलं तोच चित्रपट फ्लॉप ठरला. यानंतर तिने अजय देवगणसोबत विजयपथमध्ये स्क्रिन केली आणि त्यानंतर तिने कधी मागे वळून पाहिलेच नाही. आज तब्बू ५५ वर्षांची झाली असून तिने केलेल्या कामाची दखल घेणे महत्वाचे ठरते. तब्बूचं खरं नाव तबस्सुम फातिमा हाशमी असं आहे. तब्बूने करिअरच्या सुरुवातीला प्रेम या चित्रपटातून डेब्यू केला. हा एक रोमँटिक चित्रपट होता. या चित्रपटाला तयार होण्यासाठी बराच मोठा काळ गेला. माध्यमांमध्ये असलेल्या माहितीनुसार, प्रेम या चित्रपटाची सुरुवात १९८७ झाली. पण चित्रपट तयार होण्यासाठी तब्बल आठ वर्षांचा काळ लोटला. या चित्रपटातून तब्बूने अभिनेता संजय कपूर याच्यासोबत ऑनस्क्रिन रोमांन्स केला. मात्र, चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर यश मिळवता आलं नाही. चित्रपट फ्लॉप ठरल्यानंतर तब्बूला मोठा धक्का बसला होता. पहिलीच डेब्यू फिल्म आणि फ्लॉप यामुळे पुढे काय होणार या विचारत असतानाच तिला विजयपथ या चित्रपटात कास्ट करण्यात आलं.

रणबीर कपूरचा राम अवतार अन् यशचा दमदार अंदाज

रणबीर कपूर, साई पल्लवी आणि यश यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या बहुचर्चित 'रामायण' चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. अशातच चित्रपटाचा पहिला रिव्ह्यू समोर आला असून, त्याने चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. अभिनेता आणि प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर आशीष चंचलानी याने हा चित्रपट पाहिल्यानंतर त्याचे भरभरून कौतुक केले आहे. विशेष म्हणजे, चित्रपटातील जटायू आणि रावण यांच्यातील युद्धाचा प्रसंग पाहताना आपल्याला अश्रू अनावर झाल्याचेही त्याने सांगितले. 'रामायण' चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग नुकतेच मुंबईत आयोजित करण्यात आले होते. या स्क्रीनिंगला चित्रपटातील कलाकारांसह मनोरंजन विश्वातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींनी हजेरी लावली होती. अभिनेता आशीष चंचलानी यालाही हा चित्रपट पाहण्याची संधी मिळाली. चित्रपट पाहिल्यानंतर त्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर आपला अनुभव शेअर केला. आशीषच्या मते, 'रामायण' हा चित्रपट ऐतिहासिक ब्लॉकबस्टर ठरण्याची शक्यता आहे. चित्रपटाची भव्यता, दमदार ॲक्शन सीन्स आणि कलाकारांचा अभिनय यामुळे तो प्रभावित झाला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीने न पाहिलेले काही ॲक्शन सीन्स या चित्रपटात पाहायला मिळतील, असेही म्हटले आहे. कलाकारांच्या अभिनयाचे आशीषने विशेष कौतुक केले. रणबीर कपूर, साई पल्लवी आणि यश यांनी भूमिका उत्तम प्रकारे साकारल्याचे त्याने सांगितले. विशेषतः रणबीर कपूरच्या अभिनयाने तो प्रभावित झाला आहे. रणबीर हा एक उत्तम आणि प्रत्येक गोष्टीत बारकाईने लक्ष देणारा अभिनेता असल्याचे त्याने म्हटले. यशच्या पडद्यावरील उपस्थितीचेही आशीषने कौतुक केले. यशची एन्ट्री आणि त्याचा प्रभाव जबरदस्त असल्याचे त्याने सांगितले.



विराटचा 'दस' का दम

14 सामन्यात १० वेळा पन्नास पार पहिल्या वनडे सामन्यात न्यूझीलंडला चांगलेच पाणी पाजले

महाईन्यूज । मुंबई

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या वनडे सामन्यात भारताने किवींना १८५ धावात रोखलं त्यानंतर विराट कोहलीच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर सामन्यावर मजबूत पकड निर्माण केली. भारताना पहिला वनडे सामना ५ विकेट्स राखून जिंकला. भारताने डीआरएस नुसार १४३ धावांचे आव्हान २२.४ षटकातच पार केलं. विराटने ७४ तर गिलने ३७ धावांची खेळी केली.



विशेष म्हणजे पावसाचा व्यत्यय आलेल्या या सामन्यात विराट कोहलीने वनडे क्रिकेटमधील आपले सातत्य पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवलं. त्याने गेल्या १४ वनडे सामन्यात तब्बल १० वेळा पन्नास पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

दरम्यान, विराट कोहलीने देखील आपले ८१ वे वनडे अर्धशतक पूर्ण करत आपलं सातत्य दाखवून दिलं. विराट कोहलीने गेल्या १४ वनडे सामन्यात १० वेळी अर्धशतकापेक्षा जास्त धावा केल्या आहेत. यातील चार अर्धशतके त्याने सलग ठोकली आहेत.

सामन्याबद्दल बोलायचं झालं तर अर्शदीप सिंग (४), गुरनूर बरार(३), अंशुल कंभोज (२) यांच्या भेदक माऱ्यासमोर न्यूझीलंडचा डाव १८५ धावात संपुष्टात आला. त्यानंतर भारताने आपली फलंदाजी सुरू केल्यानंतर पावसाने व्यत्यय आणला. त्यामुळं भारताचे १८५ धावांचे टार्गेट कमी होऊन ते १४३ धावांपर्यंत आलं.

रोहित शर्मा स्वस्तात बाद झाल्यानंतर शुभमन गिल (३७) आणि विराट कोहली (७६४) यांनी दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावांची भागीदारी रचली. मात्र न्यूझीलंडच्या जेकब डफीने विराट कोहली, श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेल यांना बाद करत भारताला टेन्शन देण्याचा प्रयत्न केला.

मात्र विजयाची औपचारिकताच राहिली होती ती केएल राहुल आणि नमन धीर यांनी पूर्ण केली. भारताने २२.४ षटकात ५ फलंदाजांच्या मोबदल्यात १४३ धावा करत पहिला वनडे सामना खिशात टाकला. या विजयासह भारतीय संघाने मालिकेत आघाडी घेतली असून, विराट कोहलीच्या दमदार खेळीमुळे भारतीय चाहत्यांना पुन्हा एकदा त्याच्या जुन्या आक्रमक फलंदाजीची झलक पाहायला मिळाली.

विराट कोहलीचे सातत्य

भारताने न्यूझीलंडला १८५ धावात रोखल्यानंतर या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरूवात खराब झाली. रोहित शर्माला भोपळाही न फोडता माघारी परतावे लागले. मात्र त्यानंतर कर्णधार शुभमन गिल आणि विराट कोहलीने भारतीय फलंदाजीची धुरा आपल्या खांद्यावर घेत दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावांची दमदार भागीदारी रचली. शुभमन गिलने ५६ चेंडूत ३७ धावा ठोकत विराटला चांगली साथ दिली. या भागीदारीमुळे भारताचा विजय जवळपास निश्चित झाला.

भारत-पाकिस्तान बॉक्सिंग सामन्याआधी राडा! दुबईत भारत-पाकिस्तान बॉक्सर भिडले

महाईन्यूज । अस्ताना

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना म्हटला की प्रेक्षकांमध्ये उत्सुकता पाहायला मिळते. आता हीच रंगत बॉक्सिंगच्या रिंगणाबाहेरही पाहायला मिळाली. दुबईमध्ये भारत आणि पाकिस्तानच्या बॉक्सरमध्ये सामन्यापूर्वीच जोरदार वाद झाला. भारतीय इन्फ्लुएन्सर आणि बॉक्सर मनीष शर्मा याने पाकिस्तानी प्रतिस्पर्धी रहीम पारदेसी याच्या कानशिलात लगावली.



मनीष शर्मा हा सोशल मीडियावर 'हाफ इंजिनिअर' (Half Engineer) या नावाने प्रसिद्ध आहे. दुबईतील 'फ्युरी बाय द सी – मुका बॉक्सिंग' (Fury by the Sea – MUKA Boxing) या कार्यक्रमाच्या निमित्ताने दोन्ही बॉक्सर एका प्रमोशनल कार्यक्रमात आमनेसामने आले होते. शुक्रवारी दुबईतील निक्की बीच येथे त्यांच्यात सामना होणार आहे. आता या सामन्याकडे बॉक्सिंग चाहत्यांचे विशेष लक्ष लागले आहे.

मनीष शर्मा हा सोशल मीडियावर 'हाफ इंजिनिअर' या नावाने ओळखला जातो. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर म्हणून त्याने लोकप्रियता मिळवली. त्यानंतर त्याने बॉक्सिंगच्या क्षेत्रातही पाऊल ठेवले. सोशल मीडियावरील त्याच्या लोकप्रियतेमुळे त्याच्या आगामी सामन्याची चर्चा सुरू आहे.

आता दुबईत होणाऱ्या मनीष शर्मा आणि रहीम पारदेसी यांच्यातील सामन्याची उत्सुकता आणखी वाढली आहे. सामन्यापूर्वीच दोघांमध्ये झालेल्या या प्रकारामुळे प्रत्यक्ष बॉक्सिंग रिंगमध्ये कोण बाजी मारणार, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे. या प्रमोशनल कार्यक्रमादरम्यान दोन्ही बॉक्सरमधील शाब्दिक चकमकी आणि आक्रमक पवित्र्यामुळे वातावरण चांगलेच तापले होते. दोघांनीही एकमेकांना आव्हान देत विजयाचा विश्वास व्यक्त केला. त्यामुळे हा सामना केवळ दोन बॉक्सरमधील लढत न राहता सोशल मीडियावरही चर्चेचा विषय ठरला आहे. दोन्ही खेळाडूंचे चाहते सोशल मीडियावर आपापल्या आवडत्या बॉक्सरला पाठिंबा देताना दिसत आहेत. रहीम पारदेसी याचीही सोशल मीडियावर मोठी लोकप्रियता असून त्याच्या चाहत्यांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे मनीष शर्मा आणि रहीम पारदेसी यांच्यातील ही लढत अधिक रंगतदार होण्याची शक्यता आहे. दोन्ही खेळाडू रिंगमध्ये कोणती रणनीती वापरणार, याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे.

नेमकं काय घडलं?

सामन्यापूर्वी झालेल्या या कार्यक्रमात मनीष शर्मा आणि रहीम पारदेसी यांच्यात शाब्दिक चकमक झाली. रहीम पारदेसी हा हावभाव करून मनीषला चिथावण्याचा प्रयत्न करत होता. यामुळे दोघांमधील वाद वाढला. अखेर मनीष शर्माचा संयम सुटला आणि त्याने सर्वांसमोर रहीमच्या कानशिलात लगावली. हा प्रकार घडताच कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप केला. त्यांनी दोघांनाही एकमेकांपासून दूर केले. या घटनेमुळे कार्यक्रमात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी त्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी मनीषच्या कृतीवर आश्चर्य व्यक्त केले.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। गुरुवार ।
दि. 05 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पोलीस प्रकल्पांचा शुभारंभ

आधुनिक तंत्रज्ञानाच्या गुन्हे नियंत्रणासाठी पोलीस दलाने सज्ज व्हावे; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी | आधुनिक तंत्रज्ञान, सामाजिक उपक्रम आणि वेगवान तपासाच्या माध्यमातून गुन्हे नियंत्रणात पिंपरी चिंचवड पोलीस दलाने चांगली कामगिरी केली आहे. येत्या काळात पिंपरी चिंचवडचा विस्तार पुण्यापेक्षा अधिक होणार असल्याने पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावीपणे गुन्हे नियंत्रण करीत या आव्हानाला सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. युवाशक्तीला दिशा आणि शक्ती देण्यासाठी घर, परिसर, गाव, जिल्हा आणि महाराष्ट्र अंमली पदार्थमुक्त करावा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी (दि. ४) पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ, लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, महापौर रवी लांडगे, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशाच्या प्रगतीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या युवा पिढीला अंमली पदार्थांपासून वाचविणे ही सर्वांची जबाबदारी आहे. पुढील तीन ते चार वर्षांत देश अंमली पदार्थमुक्त करण्याचा शासनाचा निर्धार असून, त्यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. अंमली पदार्थांची निर्मिती रोखणे, वितरण साखळी मोडीत काढणे, व्यसनाधीन व्यक्तिंवर उपचार आणि जनजागृती अशा विविध पातळ्यांवर काम सुरू आहे. पालकांनीही व्यसनाधीन मुलांचे वेळीच समुपदेशन करून योग्य उपचार करावेत, असे आवाहन त्यांनी केले.



अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ

या कार्यक्रमात पोलीस मुख्यालयासाठी ताथवडे येथील जागेच्या सातबारा उताऱ्याचे हस्तांतरण करण्यात आले. सीसीटीव्ही आणि एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (आयटीएमएस) प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. पिंपरी पोलीस ठाणे, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कार्यालय, अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्सचे विभागीय कार्यालय आणि २०० शासकीय निवासस्थानांचा समावेश असलेल्या पिंपरी पोलीस संकुलाचे भूमिपूजन करण्यात आले.

पिंपरी-चिंचवडसाठी आधुनिक पोलीस आयुक्तालयाची इमारत उभारण्यात येत असून, पोलीस मुख्यालयासाठी ताथवडे येथे ५० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पोलिसांना आधुनिक आणि सर्व सुविधांनी युक्त निवासस्थाने उपलब्ध करून देण्यावरही शासनाचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना आवश्यक सुविधा आणि हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी एक कोटी रुपयांची मदत दिल्याबद्दल त्यांनी पोलीस दलाचे कौतुक केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शहराच्या सुरक्षिततेसाठी हाती घेतलेल्या प्रकल्पांचे महत्त्व अधोरेखित केले. दिवंगत अजित पवार यांनी पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीसाठी १८० कोटी रुपये मंजूर केल्याची आठवण त्यांनी करून दिली.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे गुन्हेगारांवर वचक

शहराच्या सुरक्षिततेसाठी तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरत आहे. डायल ११२ मुळे पोलिसांचा प्रतिसाद कालावधी तीन मिनिटांपर्यंत कमी झाला असून, या कामगिरीत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय राज्यात आघाडीवर आहे. सीसीटीव्ही नेटवर्क, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुन्हे तपास अधिक प्रभावी होत आहेत. एआय आधारित 'तपास सारथी' प्रणालीमुळे तपासापासून आरोपपत्र दाखल करण्यापर्यंतची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. तसेच बॉडीवॉर्न कॅमेऱ्यांमुळे पोलिसांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासह त्यांच्या सुरक्षिततेलाही मदत होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसमध्ये अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, वराळे, तळेगाव दाभाडे येथे महाराष्ट्र शासनाच्या अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत आयोजित ऑनलाइन संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.





या कार्यक्रमासाठी डॉ. सुशांत पाटील व ॲड. अनुजा पाटील मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्थेचे प्राचार्य डॉ. सुरेश शिरबहादुरकर आणि डीन ॲकॅडेमिक डॉ. योगेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक माननीय श्री. विजयानंद पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. अमली पदार्थांपासून दूर राहणे, व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करणे आणि समाजामध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी सक्रिय योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला.

एमआयटी महाविद्यालयाची आदिवासी बांधवांना मदत

सामाजिक बांधिलकी जपत सलग चौथ्या वर्षी आदिवासी कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

माणुसकीची भेट' उपक्रमातून ४०० किलो साखर, १५५ साड्या, कपडे व शालेय साहित्याचे संकलन दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि नात्यांमधील आपुलकी जपणारा सण. मात्र हा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू व वंचित बांधवांसोबत वाटण्याचा प्रेरणादायी उपक्रम एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी येथील विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने सलग चौथ्या वर्षी राबविण्यात आला. संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्वाचा एक भाग म्हणून आयोजित 'माणुसकीची भेट' या उपक्रमातून महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचा आदर्श निर्माण केला आहे.



गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील आदिवासी बांधव, हेमलकसा येथील पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या लोकबिरादरी प्रकल्पातील लाभार्थी तसेच आनंदवन येथील गरजू बांधवांना दिवाळीचा आनंद मिळावा, या उदात्त हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. याअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहभागातून ४०० किलो साखर, १५५ नवीन व वापरण्यायोग्य साड्या, लहान मुलांचे कपडे तसेच शालेय साहित्य संकलित करण्यात आले. संकलित साहित्य १७ ऑक्टोबर रोजी संस्कार प्रतिष्ठान, चिंचवड या संस्थेचे अध्यक्ष डॉ. मोहन गायकवाड यांच्याकडे पुढील वितरणासाठी सुपूर्द करण्यात आले. गेल्या चार वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणारा 'माणुसकीची भेट' हा उपक्रम केवळ वस्तू संकलनापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संवेदनशीलता, सहकार्य आणि सेवाभाव रुजविणारे प्रभावी माध्यम ठरत आहे. समाजातील गरजू घटकांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्याप्रती आपुलकी निर्माण करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. सातत्यपूर्ण सामाजिक कार्यातून महाविद्यालयाने शिक्षणाबरोबरच सामाजिक मूल्यांची जोपासना करण्याचा प्रयत्न केला आहे.

या उपक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेषतः डॉ. बाळासाहेब वाफारे, डॉ. अक्षदा कुलकर्णी, डॉ. मानसी अतितकर, डॉ. वैशाली खेरडेकर, डॉ. कविता महाजन, डॉ. पद्मावती उंडाळे, डॉ. मयुरी बापट, डॉ. सुनैना शिवथरे, डॉ. वंदना पवार, डॉ. अर्चना आहेर, डॉ. विद्या चांदगुडे, डॉ. शिल्पा कोल्हे, डॉ. प्रीती भरांबे, प्रा. पल्लवी महागांवकर, रेश्मा सोमवंशी, सुषमा चाळके, शीतल भंडांगे, रश्मी लाड, निशिगंधा भालेकर, विठ्ठल गोरे, रश्मी पाठक, विश्वजीत सुरवसे, संदीप तळेकर तसेच लेखा विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून जीवनावश्यक वस्तू, कपडे आणि शालेय साहित्याचे मोठ्या प्रमाणावर संकलन झाले. उपक्रमाचे नियोजन व आयोजन विद्यार्थी विकास मंडळाच्या प्रमुख प्रा. पल्लवी महागांवकर आणि मंडळाच्या सर्व सदस्यांनी केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे आणि उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ ज्ञानार्जन नसून समाजाप्रती जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविणे हाही आहे. 'आपला आनंद इतरांसोबत वाटण्यातच खरा दिवाळीचा आनंद दडलेला आहे,' हा संदेश देत महाविद्यालयाचा 'माणुसकीची भेट' उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा क्रिकेटमध्ये मुलांच्या संघाला पाचव्यांदा विजय

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

अनुभूती इंटरनॅशनल स्कूल मैदान, जळगाव येथे दिनांक 01 ते 04 नोव्हेंबर 2026 या कालावधीत झालेल्या शालेय राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयातील 17 वर्षाखालील मुलांच्या संघाने पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करत अंतिम सामन्यात लातूर विभागाचे दहा ओव्हर मध्ये 67 धावांचे आव्हान देण्यात आले त्याला प्रत्युत्तर देताना राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालय मुलांच्या संघाने 1 ओव्हर राखुन हे आव्हान सहज पूर्ण केले. त्यामुळे पाचव्यांदा विजेतेपद मिळविले.



या विजयात आयुष गुप्ता याने नाबाद 34 धावा केल्या व समर्थ पवार, दर्शीत पाटील यांनी संघाच्या धावसंख्या वाढवण्यासाठी मोलाची भूमिका बजावली.तसेच गोलंदाज पार्थ सोनवणे याने दोन ओव्हर मध्ये 02 गडी बाद केले व रुद्र पाटील ,ओंकार गुरुनावर, रमण महाडिक यांनी दोन ओव्हर मध्ये प्रत्येकी 01 गडी बाद करत या सर्व खेळाडूंनीसंघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यापूर्वी झालेल्या उपांत्य फेरीत नागपूर विभागाच्या संघाला पुणे विभागाच्या राजमाता जिजाऊ संघाने 10 ओव्हर मध्ये 130 धावांचे आव्हान देण्यात आले होते परंतु नागपूर विभागाचा संघ 10 ओव्हर मध्ये 96 धावाच करू शकला त्यामुळे राजमाता जिजाऊ संघाने विजय मिळून अंतिम फेरीत दिमाखदार प्रवेश केला.

या शालेय राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर या आठ विभागातील संघ सहभागी झालेले होते. त्यात राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयातील मुलांच्या संघाने पुणे विभागाच्या प्रतिनिधित्व करत प्रथम क्रमांक मिळविला या विजयी संघात रुद्र पाटील(कर्णधार), समर्थ पवार, पार्थ सोनवणे रमण महाडिक, दर्शित पाटील, देव प्रधान, अर्णव डेरे, आर्यन गोपाळे, दृष्टांतराजे पिंगळे, ओंकार गुरूनावर, भव्य ओसवाल, अर्णव डेरे, मिथुन चव्हाण, आयुष गुप्ता आरुष सिंग, प्रज्वलमोरे,या खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे व प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय वाळके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिं.चिं.मनपा स्थायी समिती मा.अध्यक्ष श्री अजित भाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीरभाऊ मुंगसे सर,पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा.संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF
LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support



ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in